# महाराष्ट्र शासन
# शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
## १७, डॉ.आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-०१

Web:www.jdhepune.info E_mail ID- admin@jdhepune.info

फोन नं.०२०-२६१२७८३३ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.ससं/उशि/पुवि/पीएच.डी.२ वे.वाढी/२०२० /१९५० दि.२४/०८/२०२०

प्रति, **महत्वाचे/तात्काळ**

१) कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२) प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,
शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
पुणे/अहमदनगर/नाशिक जिल्हे.

विषय:- मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील दि.०१.०१.१९९६ पूर्वीच्या पीएच.डी. अर्हता धारण केली असणाऱ्या अध्यापकीय कर्मचाऱ्यांना पीएच.डी. च्या दोन आगाऊ वेतनवाढी अनुज्ञेय करणेबाबत...

संदर्भ:- १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.न्यायाप्र-२०१७/प्र.क्र.४१९/१७/ विशि-१, दि.१३/०९/२०१९.
२) या कार्यालयाकडील समपत्र क्र.१२१, दि.१४/०१/२०२०.
३) या कार्यालयाकडील समपत्र क्र.१०८७, दि.२४/०६/२०२०.
४) या कार्यालयाकडील समपत्र क्र.१३४०, दि.२०/०७/२०२०.

उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील ज्या अधिव्याख्यात्यांनी दि.०१/०१/१९९६ पूर्वी पीएच.डी. अर्हता धारण केली आहे अशा अधिव्याख्यात्यांना पीएच.डी. च्या आगाऊ दोन वेतनवाढी दि.२७/०७/१९९८ अनुज्ञेय करण्यात आलेल्या आहेत. त्याऐवजी या दोन आगाऊ वेतनवाढी दि.०१/०१/१९९६ पासून अनुज्ञेय करण्यात आलेल्या आहेत.

उक्त बाब विचारात घेता, आपल्या महाविद्यालयातील पात्र ठरणाऱ्या अधिव्याख्यात्यांना दोन आगाऊ वेतनवाढी दि.२७/०७/१९९८ ऐवजी दि.०१/०१/१९९६ रोजी अनुज्ञेय करण्यासाठी प्रस्तावाची महाविद्यालयस्तरावरुन प्राचार्यांनी स्वत: छाननी करुन वेतननिश्चितीस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मूळ सेवापुस्तक व इतर अनुषंगिक कागदपत्रांसह या कार्यालयास तात्काळ सादर करण्याबाबत संदर्भिय परिपत्रकान्वये आपणांस कळविण्यात आलेले आहे.

तथापि, संदर्भ क्र.२, ३ व ४ नुसार वारंवार पत्रव्यवहार करुनही अनेक महाविद्यालयांनी अद्याप प्रस्ताव सादर केल्याचे दिसून येत नाही.

तरी सदरचे प्रस्ताव **तात्काळ** या कार्यालयाकडे **दि.३१/०८/२०२० पर्यंत** सादर करण्यात यावेत. याबाबत काही न्यायालयीन प्रकरण/तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

**(डॉ.मोहन खताळ)**
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

प्रत:- मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीसाठी सविनय सादर.